दुरध्वनी क्र. 022 25421373
25434349
इमेल - dcfthane@gmail.com
dycftahne@mahaforest.gov.in

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**वनविभाग**

# उप वनसंरक्षक ठाणे वनविभाग ठाणे यांचे कार्यालय

मॅरेथॉन सर्कल,लाल बहादुर शास्त्री मार्ग नौपाडा ठाणे - 400 602

पत्र जा.क्र.कक्ष -25/ब/मोजणी/एफसीए/ 1224 /2023-24 दिनांक -20 /06/2024

प्रति,

Project Manager,
PIU Thane, National Highway Authority of India,
Project implementation Unit Thane,
MTNL building Opp. Babubhai Petrol Pump,
LBS Marg, Near Castle Mill Circle,
Thane West – 400 601.

**विषय -** Diversion of 111.7321 Ha. of forest land for Devlopment of Vadodara Mumbai Expressway (Phase II SPUR Alignment) from Km 0+000 to Km 79.783 in Palghar, Thane & raigad District in the State of Maharashtra –

**संदर्भ -**

1. केंद्र शासन पत्र क्र. FC-III/MH-50/2022-NGP/10338 दि. 25/09/2022.
2. केंद्र शासनाकडील पत्र क्र. FC-Misc-312/RON/2023-NGP/11432 दि. 11/04/2023.
3. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-25/ब/मोजणी/एफसीए/3763 दि. 25/10/2023.
4. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-25/ब/मोजणी/एफसीए/3810 दि. 27/10/2023.
5. वनक्षेत्रपाल, कल्याण यांचेकडील पत्र क्र. मोजणी/एफसीए/890 दि. 13/11/2023.
6. उप वनसंरक्षक, अलिबाग यांचेकडील पत्र क्र. ब/20/जमिन/व.सं./5435 दि. 08/12/2023.
7. वनक्षेत्रपाल, बदलापूर यांचेकडील पत्र क्र. योजना/1503 दि. 19/12/2023.
8. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-25/अ/मोजणी/एफसीए/1804 दि. 15/01/2024.
9. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचेकडील पत्र क्र. कक्ष-10/वसं/प्र.क्र.50/13-14/585 दि. 28/02/2024.
10. दि. 01/03/2024 रोजी मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचे दालनात झालेली चर्चा.
11. वनक्षेत्रपाल, पडघा यांचेकडील पत्र क्र. अ/पडघा/159 दि. 11/06/2024.
12. वनक्षेत्रपाल, भिवंडी यांचेकडील पत्र क्र. अ/अंदाजपत्र/171 दि. 11/06/2024.
13. उप वनसंरक्षक, जव्हार यांचेकडील पत्र क्र. ब-20/जमीन/वसं/653 दि. 13/06/2024.
14. उप वनसंरक्षक, डहाणू यांचेकडील पत्र क्र. ब-20/जमीन/वसं/924 दि. 14/06/2024.

वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत वडोदरा मुंबई एक्सप्रेसवे (Phase II SPUR) 0+000 किमी ते 79+783 किमी अंतरासाठी डहाणू, जव्हार, ठाणे व अलिबाग वनविभागातील एकूण 111.7321 हे. वनक्षेत्र मागणीचा प्रस्तावास केंद्र शासनाकडील संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये 1 ते 25 च्या अटी व शर्तीच्या अधिन राहून तत्वत: मान्यता प्राप्त झाली आहे.

केंद्र शासनाकडील तत्वत: मान्यता पत्रातील **अट क्र.** viii नुसार प्रस्तावांतर्गत प्रस्तावित क्षेत्राचे गुणोत्तरानुसार ठाणे वनविभागांतर्गत 41807, डहाणू वनविभागांतर्गत 13057, व जव्हार वनविभागांतर्गत 10580 व अलिबाग वनविभागांतर्गत 9556 असे एकूण 75000 रोपे तयार करण्यासाठी रोपवाटीका व रोपे लागवडीसाठी 10 वर्षाची योजना तयार करून आवश्यक रक्कमेची अंदाजपत्रके केंद्र शासनाकडील उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार सादर करण्यास या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वये उप वनसंरक्षक, डहाणू, जव्हार व अलिबाग यांना कळविले होते. तसेच ठाणे वनविभागांतर्गत 41807 रोपे तयार करण्यासाठी रोपवाटीका व रोपे लागवडीसाठी 10 वर्षाची योजना तयार करणेकरीता प्रस्तावांतर्गत प्रस्तावित क्षेत्राच्या गुणोत्तरानुसार भिवंडी वनपरिक्षेत्राकरीता 11697, पडघा वनपरिक्षेत्राकरीता 8075, कल्याण वनपरिक्षेत्राकरीता 5106 व बदलापूर वनपरिक्षेत्राकरीता 16929 यांना संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वये यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार केंद्र शासनाकडील तत्वत मंजूरी पत्रातील अट क्र. viii नुसार 75000 **रोपे तयार करणेकामी रोपवाटीकेसाठी** 10 **वर्षाकरीता** व **50 % रोपे लागवडीकरीता 10 वर्षासाठी** आवश्यक रक्कमेचे अंदापजत्रके संदर्भिय पत्र क्र. 5 ते 7 व 11 ते 14 अन्वये या कार्यालयास प्राप्त झाले आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **वनविभाग** | **क्षेत्र (हे.)** | **रोपांची संख्या** | **अंदाजपत्रकीय रक्कम (रु.)** |
|---|---|---|---|---|
| 1 | ठाणे | 62.2824 | 41807 | 14785373 |
| 2 | डहाणू | 19.4521 | 13057 | 6036213 |
| 3 | जव्हार | 15.7617 | 10580 | 2818700 |
| 4 | अलिबाग | 14.2359 | 9556 | 9602355 |
| | **एकूण** | 111.7321 | **75000** | **33242641** |

तसेच या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 8 अन्वये वन संवर्धन अधिनियम, 1980 अंतर्गत विविध प्रकल्पाकरीता केंद्र शासनाकडून देण्यात येणाऱ्या तत्वत: मंजूरी व अंतिम मान्यता पत्रामध्ये राष्ट्रीय वन नीती / वृक्ष आच्छादन सुधारणे आणि राज्यतील प्रदूषण कमी करणेकामी वन धोरण, 1988 आणि पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, 1986 नुसार संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या (JFMC's) सहभागाने स्थानिक वनप्रजाती, फळझाडे, औषधी वनस्पती, शोभिवंत वनस्पती इत्यादी रोपे तयार करून त्यापैकी 50 % रोपे स्थानिक लोकांना लागवडीकरीता मोफत देवून व उर्वरित 50 % रोपे JFMC's अंतर्गत वळतेकरण होणाऱ्या क्षेत्राच्या परिसरामध्ये लागवड करण्याबाबतच्या अटीचा समावेश असल्याने सदर अटीकरीता आवश्यक रक्कमेचा भरणा कोणत्या खात्यामध्ये जमा करून घेण्यात यावी याबाबत मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचेमार्फत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा.नागपूर यांचेकडून मार्गदर्शन मिळणेकामी प्रचलन होणेस विनंती केली आहे.

त्यानुसार उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 9 अन्वये मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांनी वन (संरक्षण एवम संवर्धन) नियम, 2023 दि. 29/12/2023 रोजीच्या Handbook मधील Chapter 1 परिच्छेद क्र. 1.5 चे अवलोकन करण्यास कळविले आहे. तसेच संदर्भिय पत्र क्र. 10 अन्वये दि. 01/03/2024 रोजी मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचे दालनात झालेल्या चर्चेनुसार सदर अटीकरीता आवश्यक रक्कमेचा भरणा Ad Hoc CAMPA च्या खात्यामध्ये भरणा करण्याचे निर्देश प्राप्त झाले आहेत.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, केंद्र शासनाकडील तत्वत मंजूरी पत्रातील **अट क्र.** viii **नुसार** प्रस्तावांतर्गत प्रस्तावित क्षेत्राच्या गुणोत्तरानुसार 75000 **रोपे तयार करण्यासाठी रोपवाटीका व** 10 **वर्षासाठी 50 % रोपे लागवडीकरीता** एकूण आवश्यक रक्कम **रु.** 33242641 /- **(अक्षरी रक्कम रु. तीन कोटी बत्तीस लाख बेचाळीस हजार सहाशे एकेचाळीस मात्र)** चा भरणा Ad Hoc CAMPA च्या खात्यामध्ये करण्यात यावी व तसे या कार्यालयास अवगत करण्यात यावे. जेणे करून प्रस्तावाबाबतचे पुढील संस्करण करणे सोईचे होईल.

(संतोष सस्ते)
**उप वनसंरक्षक**
**ठाणे वनविभाग ठाणे**

**प्रतिलीपी -** मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रतिलीपी -** उप वनसंरक्षक, डहाणू, जव्हार व अलिबाग यांना माहिती व कार्यवाहीस्तव अग्रेषित.